Vol 5 Issue 6 Dec 2015

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

***International Advisory Board***

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

***Editorial Board***

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 6 | Dec - 2015

GRT Golden Research Thoughts

# संत तुकाराम महाराज अभंग रचना

महाजन सुर्दशन
कला शाखा , द.ग.तटकरे महाविद्यालय ,माणगांव – रायगड.

## प्रस्तावना :–

महाराष्ट्र ही संतांची भुमी म्हणुन ओळखली जाते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव, संत रामदास हे महाराष्ट्रात जन्माला आले हे आपले महद्‌भाग्य आहे. या सर्व संतांनी समाजप्रबोधन जनजागृती करण्याचे काम केल्याचे दिसुन येते. त्याचे विचार त्यांनी आपल्या ग्रंथसंपदेतुन मांडण्याचा प्रयत्न केला व समाजातील तळागाळातील असणाऱ्या माणसामध्ये इश्वराची भक्ती रूजवण्याचा प्रयत्न केला व रूढी परंपपरेने ग्रस्त झालेल्या माणसाचे अज्ञान काढुन टाकण्याचे कार्य संतांनी केले व एक माणुस म्हणुन जगायला शिकविले. संतांनी अनेक अभंग आणि ओवी हे दोन काव्यरचना केल्याचे दिसुन येते.

अभंग आणि ओवी हे दोन काव्यरचनेचे प्रकार म्हणजे मराठी वाङ्‌मयाचा पाठीचा कणा आहे. मराठी मनाला अभंगाचे वेड आहे आणि ओवीचा लळा आहे. ज्याला ओवी रचना व अभंगारचना येते. त्याच्यावर देव प्रसन्न झालेला असलाच पाहिजे अशी मराठी मनाची धारणा आहे.



मराठी मनाला वश करण्यासाठी एकीकडे वीरश्रीयुक्त पोवाडे तर दुसरीकडे धुप,दीप,नैवदय यांच्याशी सख्य सांगणारी ओवी व अभंग हेच प्रभावी साधन ठरते. ज्ञानेश्र्वरांनी पहिल्या प्रथम ओवी व अभंग यांचा सुई दोरा घेऊन हरिभक्तीचे विशाल सुंदर वस्त्र विणले, शालु व पैठण्या, पितांबर व उत्तरीये विणली आणि पंढरपुरच्या पांडुरंगाला सजविले. नामदेवाने ज्ञानेश्र्वरांच्या संगतीत राहुन घरोघरी ओवीरूप नंदादीपाचा प्रकाश पसरवला आणि अभंगाचे त्रीपुर झगमगते केले. संतांच्या ग्रंथात या दोन छंदांची मक्तेदारीच आहे आणि देवाला प्रसन्न करायचे असेल तर अभंगांच्या तबकात ओव्यांची निरांजने प्रदीप्त करून त्याला आरती ओवाळावी लागते असे वाटु लागते. ज्ञानदेवे रचिला पाया' या अभंगात " तुका झालासे कळस" असे शब्द घालुन कवीने असे दर्शविले आहे की, संत तुकारामांची अभंग रचना सर्वोत्तम आहे व त्यामुळे भागवत धर्माचा पुर्ण विकास तेथे झाला आहे.

सुश्र्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिध्द तुकयाची |
ओवी ज्ञानेशाची, तैसी आर्या मयुर पंताची ||

वरील एक श्लोक आम्ही लहानपणा पासुन म्हणत आलो आहोत.

त्यात वामनपंडीत व मोरोपंत या दोन पंडित कवींची व संत ज्ञानेश्र्वर आणि संत तुकाराम या दोन संत कवींची पशंसा केली आहे.

## उदिष्ट्ये

१. संत तुकारामांच्या अभंगाची वैशिष्टे जाणुन घेणे.
२. संत तुकारामांच्या अभंगाचा अभ्यास करणे.

## संत तुकारामांचा जीवन परिचय

संत तुकारामांचा जन्म पुण्याजवळील देहु या गावी इ.स.१६०८ मध्ये झाला. त्यांचे आडनाव अंबिले होते आणि कुळ मोरे होते. त्यांचा पिढीजात व्यवसाय वाण्याचा होता. हे घराणे देहु गावचे महाजन होते. तुकारामांच्या वडिलांचे नाव बोल्होबा व आईचे नाव कनकाई होते, दोघे ही साधुवृत्तीचे होते. बोल्होंबाची परंपरेने पंढरीची वारी, देवाची निरपेक्ष सेवा म्हणुन त्यांच्या पोटी तुकोबारायांनी जन्म घेतला.

"शुध्द विजापोटी |
फळे रसाळ गोमटी ||"

अशी अख्यायिका आहे . हया घराण्याच्या मुळ पुरुपाने,विश्वंभर यांनी,घरातच विठ्ठल भक्तीचा वारसा चालत आला होता . अशा विठ्ठलभक्तीच्या वातावरणात शुभ संस्कार तुकारांमावर लहानपणापासुन झाले होते . घरात महाजनकी होते . त्यांनी संस्कृतचाही परिचय करुन घेतला होता . गीता आणि भागवत या ग्रंथांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता कथाकीर्तने आणि भजने ऐकुन तुकाराम बहुश्रुत झाले होते . सदाचार न सोडता व्यवहार कसा करावा,हयाची शिकवण त्यांना घरातुन मिळाली होती . तुकाराम १३ वर्षाचे झाल्यावर त्यांच्या वडिलांनी सावकारी,व्यापार आणि महाजनकी हयांचे व्यवहार हळुहळु वर्षापर्यंत तुकारामानी घरचे सर्व व्यवहार वडिलांच्या मार्गदर्शनाखाली जबाबदारीने सांभळले होते . तुकोबारायांनी सर्व आयुष्य कीर्तनात घालवले .

"हरिभजने हे धवळले जग |चुकविला लाग कळि काळाचा ||"

नामस्मरणाच्या माध्यमातुन भक्तिचा प्रचार, प्रसार केला . तुकारामांच्या प्रगल्भ चिंतनाने त्यांचे अभंग प्रसन्न व प्रासादीक होते .

अशी आख्यायिका आहे की, तुकाराम महाराजांनी ४ कोटी अभंगरचना केली होती . " शतकोटी अभंग" असा उल्लेख आढळतो . नामदेवांचा तो संकल्प होता व ती संख्या पुर्ण करण्याची विनंती नामदेवांनी स्वप्नात येऊन तुकारामांना केली होती . असे उल्लेख सापडतात अर्थात तुकारामांची उपलब्ध अभंग संख्या आज ३00 वर्षानंतर जेमतेम ४,५00 एवढीच असल्याचे दिसुन येते .

### अभंग

१ . समचरण दृष्टी विटेवरी साजिरी| तेथे माझी हरि वृत्ती राहो ||१||
आजिक न लगे मायिक पदार्थ | तेथे माझे आर्त नको देवा ||२||
बम्हादिक पदे दुःखाची शिराणी| तेथे दुश्चित्त झणी जडो देसी ||३|
तुका म्हणे त्याचे कळले आम्हा वर्म | जे जे कर्मधर्म नाशवंत ||४||

### अर्थ

हे हरी, तुझी साजिरी मुर्ती विटेवर उभी आहे . त्या मुर्तीचे चरण सम आहेत . तुझी दृष्टी सम आहे . अशा तुझ्या ठिकाणी माझी मनोवृत्ती सतत स्थिर राहो . हे देवा मला आणखी कोणताही मायिक पदार्थ नको, त्या विषयी माझ्या मनात तृष्णाच राहु नये . तळमळ राहु नये . हे देवा, बम्हदेव इत्यादींची मोठी पदे म्हणजे दुःखाचीच वतनदारी आहे . माजे दुश्चित होऊ नये आणि माझ्या मनात त्या पदांची इच्छा चुकुन सुध्दा उत्पन्न होऊ देऊ नकोस तुकाराम महाराज म्हणतात आम्हाला त्या धर्मकर्माचे वर्म कळले आहे . ते तर सगळे नाशवंतच आहेत . ||१||

२ ) आलिंगन घडे | मोक्ष सायुज्यता जोडे ||१||
ऐसा संतांचा महिमा | जाली बोलायची सीमा ||२||
तीर्थ पर्वकाळ | अवघी पायांपे सकळ ||३||
तुका म्हणे देवा | त्यांची केली पावे सेवा ||४||

### अर्थ ः......

संतांबद्दल तुकाराम महाराज गौरवाने बोलतात ही जेव्हा संतांची भेट होते, तेव्हा सायुज्य मुक्तीच जणु लाभते,एवढा संतांचा अधिकार आहे . त्या अधिकाराचे वर्णन करणेच कठीण आहे . जेवढे पर्वकाळ आहेत व तीर्थ आहेत, ती सर्व ज्यांच्या पायांशी नांदतात . त्या पुरूषांची सेवा केली असता ती देवाला पोहोचते . ||२६||

३ ) शुध्द बीजापोटी | फळे रसाळ गोमटी ||१||
मुखी अमृताची वाणी | देह देवाचे कारणी ||२||
सर्वांग निर्मळ | चित्त जैसे गंगाजळ ||३||
तुका म्हणे जाती | ताप दर्शने विश्राती ||४||

### अर्थ

बीज शुध्द असले म्हणजे त्यापासुन रसाळ व उत्तम फळे उत्पन्न होतात . असे सांगुन तुकाराम महाराज पुढे म्हणतात की,ज्याच्या मुखात अमृततुल्य गोड शब्द आहेत आणि ज्याचा देह देवकार्यासाठी वापरला जात आहे,जो मनुष्य सर्वांगाने निर्मळ आहे आणि चित्त गंगाजळाप्रमाणे पवित्र आहे . त्याच्या दर्शनाने त्रीविध ताप जातात आणि चित्ताला विश्रांती मिळते . ||३७||

४ ) दया क्षमा शांती| तेथे देवाची वसति ||१||

पावे धांवोनिया घरा | राहे धरोनिया थारा ||२||
कीर्तनाचे वाटे| बराडिया ऐसा लोटे ||३||
तुका म्हणे घडे | पुजा नामे देव जोडे ||४||

अर्थ

तुकाराम महाराज सद्‌गुणांची प्रशंसा करताना म्हणतात "दया, क्षमा व शांती या वृत्ती जेथे आहेत तेथे देवाजी वस्ती आहे . ज्या अंगी हे गुण आहेत त्याच्या घरी देव धावत येतो आणि निरंतर आपल्या वस्तीचे ते ठिकण करतो कीर्तन करणाऱ्याकडे देव दुष्काळात उपाशी असलेला माणुस जसा अन्नासाठी धावत येतो तसा धावत येतो देवाचे नुसते नाव घेतल्यानेच त्याची पुजा होते आणि तो येऊन भेटतो .ड ||९३५||

५) वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे | पक्षीची सुस्वरे आळविती ||१||
येणे सुखे रूचे एकांताचा वास | नाही गुणदोष अंगा येत ||२||
आकाश मंडप पृथिवी आसन | रमे तेथे मन क्रीडा करूं ||३||
कंथा कमंडलु देह उपचारा | जाणवितो वारा अवसरू ||४||
हरि कथा भोजन परवडी विस्तार |करोनि प्रकार सेवु रूची ||५||
तुका म्हणे होय मनासी संवाद | आपुलाची वाद आपणांसी ||६||

अर्थ

तुकाराम महाराज म्हणतात वृक्ष, वेली आणि वन्य पशु आणि सुस्वर गायन करणारे पक्षी हे आमचे सोयरे आहेत, नातलग आहेत . त्या सुखाने आम्हाला एकांताचा वास आवडतो व कोणताही त्रास होत नाही तसेच आमचे गुण दोष पाहणारे लोक तेथे नसल्याने गुण दोषही चिकटत नाहति . आकाश हा वर मंडप आहे आणि पृथ्वी आमचे आसन आहे . तेथे आमचे मन रमते आणि सृष्टीशी खेळत बसते . अर्थात आम्ही तेथे आनंदाने क्रीडा करतो . देहाच्या उपचारासाठी कथा आहे आणि एक कमंडलु आहे . वाऱ्याच्या वाहण्यावरून सकाळ, दुपार, संध्याकाळ झाली का हे कळते . त्या ठिकाणी आम्ही अनेक प्रकारे हरिकथा विस्ताराने वर्णन करू आणि वादविवाद ही मनाचाच मनाशी होतो .

अशा प्रकारे तुकाराम महाराजांचे अभंगअनेक प्रकारचे आहेत .

त्यातील एक सर्वात प्रसिध्द व वारंवार आढळणारा प्रकार म्हणजे सहा अक्षरांचे तीन चरण व चार अक्षरांचा चौथा चरण असणारा अभंग .

उदाहरण तुका म्हणे काही | न मागो आणिक| तुझे पायी सुख सर्व आहे||
घार हिंडते आकाशी| तिचे लक्ष पिलापाशी||

असे छोटे छोटे चरण असणारा अभंग अभंगात ठराविक शब्दाचे यमक साधलेले असते तुकारामांनी अभंगाशिवाय इतर अनेक प्रकारची काव्य रचना केली आहे . त्यात श्लोक, ओव्या, गीते, कथानक वर्णन, दीर्घ पदय प्रकार, लोकगीतांच्या धर्तीवरची केलेली पुष्कळ रचना आहे . तुकारामांचा काव्य शास्त्राचा अभ्यास चांगला होता . शब्दसाधना फार उत्तम प्रकारची होती . उगाच "वेडे वाकुडे गाईन" असे त्यांनी म्हटले तरी तो त्यांचा विनय होता .

निष्कर्ष

आपल्याला असे दिसुन येते की, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ महाराज व संत रामदास यांनी स्वतःच्या वैयक्तिक जीवनातील लौकिक तपशील स्वतःफारसा वर्णन करून ठेवला नाही . या उलट स्वतःच्या जीवनाकडे साक्षित्वाने बघणारे तुकाराम महाराज अनेक अभंगात आपल्या जीवनातील प्रसंगाचे नीट वर्णन करून ठेवतात .

त्यांच्या अभंगरचनेचे काही गुण लक्षात घेण्यासारखे आहेत . एक म्हणजे जरी अनेक ठिकाणी संसारातील शहाणपणाचे विचार, मानसशास्त्रीय पैलु आणि घटनांची वर्णने त्यांच्या अभंगात आढळत असली तरी सर्व भर श्रीकृष्णाच्या सगुण भक्तीवर आहे . पांडुरंग म्हणजेच भगवान श्रीकृण व तोच विष्णु या श्रध्देने त्यांनी प्रत्यक्ष देवाची भेट व्हावी म्हणुन तळमळीने प्रार्थना केल्या आहेत . आपण पतितपावन अशा देवाने आपला उध्दार करून आपल्याला त्याच्या चरणांशी स्थान दिलेच पाहिजे अशा भुमिकेतुन त्यांनी देवाशी संवाद साधला आहे .

भक्त व भगवंत यातील द्वैत, अद्वैताच्या पाश्वभुमीवर आनंदाने डोलताना त्यांच्या अभंगात पहायला मिळते तुकारमांना मोक्ष नको होता, नैष्कर्म्य अवस्था नको होती . देवाच्या सृष्टीकार्यात धर्म रक्षणाच्या व अधर्म नाशाच्या कार्यात भाग घेण्यासाठी ते "देवा मला काही नकोस तुला काय हवे आहे ते मला सांग" अशीच त्यांची भुमिका होती . ते म्हणतसुखे गर्भवासी घालावे आम्हासी |

असा प्रकारे संत तुकाराम हे महाराष्ट्राच्या जन जीवनाशी अगदी एकरूप झालेले होते . तुकारामांची भाषा व त्यांची सुवचने लोकांच्या बोली भाषेत म्हणी व वाक्प्रचार म्हणुन रूळली आहेत .

संत रामदासांच्या साहित्यातील उदाहरणे सामान्य लोक सहजा सहजी व्यवहारात वापरतात . ते दोघे संत समकालीन होते . दोघांची रचना फारच लोकाभिमुख होती . मराठी संत परंपरेन आपल्या जीवनाशी अत्यंत प्रामाणिक अशी वाड्.मय निर्मीती करणारे तुकाराम महाराज हे एकमेव संत असावेत .

## संदर्भ ग्रंथ


| लेखकाचे नाव | पुस्तकाचे नाव |
|---|---|
| कृष्णभक्त घैसास दि . अ . | वै . जोग महाराज सांप्रदायिक धार्मिक प्रकाशन संस्था, मंबई प्रथम आवृत्ती, वर्ष २०११ |
| ह . भ . प . पाटील यशवंत मधकर | परमार्थिक शतकोटी (भार्ग २)साधन संग्राहल धार्मिक प्रकाशन, ठाणे प्रथम आवृत्ती, वर्ष २००५ |
| भावे विनायक लक्ष्मण | महाराष्ट्र सारस्वर्त खंर्ड १,२ . पॉप्युलर प्रकाशन, मुंबई सहावी आवृत्ती, वर्ष १९८३/१९०५ |
| नासिराबादकर ल . रा | प्राचीन मराठी वाङःमयाचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापुर सातवी आवृत्ती, ऑक्टोबर्र २००३ |
| डॉ . देशपांडे अच्युत नारायण | प्राचीन मराठी वाङःमयाचा इतिहास भार्ग ५ व्हीनस प्रकाशन,पूणे प्रथम आवृत्ती, एप्रिर्ल १९८२ |

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org